दिवाणी किरकोळ अर्ज क्र.११/२०२५ मध्ये नि.क्र.१ वरील आदेश.

१. अर्जदार यांनी प्रस्तुत अर्ज बॉम्बे रेग्युलेशन अॅक्ट खाली वारस दाखला मिळणेकरीता दाखल केलेला आहे.

२. अर्जदार यांचे थोडक्यात म्हणणे असे की, अर्जदार क्र.१ चे पती व अर्जदार क्र.२ व ३ यांचे वडील अब्दुलरब. अ. रहीमान उकये हे दिनांक ३०.०९.२०२४ रोजी मयत झाले आहेत. अर्जदार यांना मयत अब्दुलरब. अ. रहीमान उकये यांचे नावे असलेली पियाजिओ रिक्षा नोंदणी क्र.एम.एच.०६/ए.एल.–८१६० ही अर्जदार यांच्या नावे करुन घेणेचे असल्यामुळे ते मयत अब्दुलरब. अ. रहीमान उकये यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. वरील रिक्षाचे मालक मयत झाले असल्यामुळे त्यांच्या पश्चात अर्जदार हे त्यांचे एकमेव वारस आहेत तसेच अन्य कोणीही कायदेशीर व जवळचे वारस नाहीत. त्यामुळे अर्जदार क्र.१ ते ३ हे वारस असल्याने त्यांच्या नावे वारस दाखला मिळण्याकरीता सदरचा अर्ज दाखल करुन मंजूर करण्याची विनंती केलेली आहे.

३. प्रस्तुत प्रकरणात अर्जदार क्र.१ यांनी त्यांच्या कथनाच्या पुष्ठ्यर्थ निशाणी क्र.१२ वर त्यांचा तोंडी पुरावा व निशाणी क्र.१३ वर अर्जदार क्र.२ यांचा पुरावा दिलेला आहे. तसेच निशाणी क्र.२३ वरील

पुरशिसनुसार अर्जदार यांनी त्यांचा तोंडी पुरावा बंद केला.

४. अर्जदार यांनी त्यांचे आधारकार्ड, रेशन कार्ड यांच्या प्रमाणित प्रती दाखल केल्या आहेत. अर्जदार यांनी अब्दुलरब. अ. रहीमान उकये हे दिनांक ३०.०९.२०२४ रोजी मयत झाल्याबाबत त्यांच्या मृत्यू दाखल्याची प्रमाणित प्रत निशाणी क्र.१४ कडे दाखल केलेली आहे. अर्जदार यांनी आधारकार्डच्या सत्यप्रती अनुक्रमे नि.क्र.१९, २० व २१ कडे दाखल केलेल्या आहेत. अर्जदार यांनी दिनांक ०९.०९.२०२५ रोजीच्या दैनिक सागर या वृत्तपत्रामध्ये मयत अब्दुलरब. अ. रहीमान उकये यांच्या मृत्यू बाबत नि.क्र.२२ ची नोटीस प्रसिध्द केली. सदरची नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सहा महिन्याच्या कालावधीमध्ये न्यायालयात कोणीही हरकत उपस्थित केली नाही.

५. अर्जदाराच्या पुराव्यानुसार अर्जदार क्र.१ ते ३ हेच मयत अब्दुलरब. अ. रहीमान उकये यांचे कायदेशीर वारस होय. त्यांच्या पुराव्यावरुन व भारतीय वारसा कायद्यातील तरतुदी विचारात घेवून असे निदर्शनास येते की, मयत अब्दुलरब. अ. रहीमान उकये यांचे वारस म्हणून अर्जदार क्र.१ शेरबानु अब्दुलरब उकीये या पत्नी, अर्जदार क्र.२ रिबा जिब्रान वांगरे व अर्जदार क्र.३ सुहा अब्दूल रब उकये या मुली या नात्याने मयताचे वारसदार आहेत. सदर अर्जास कोणीही हरकत घेतलेली नाही. अर्जदाराचे कथन व तोंडी पुरावा कोणीही नाकारलेला नाही. त्यामुळे अर्जदार यांनी अर्जात मागणी केल्याप्रमाणे वारस दाखला मिळण्यास अर्जदार

पात्र आहेत. सदरचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

:: आदेश ::

१. अर्ज मंजूर करण्यात येत आहे.

२. अर्जदार क्र.१ ते ३ हे मयत अब्दुलरब. अ. रहीमान उकये यांचे कायदेशीर वारस असल्याबाबत अर्जदार यांच्या नावे वारस दाखला देण्यात येत आहे.

३. अर्जदार यांनी न्यायालयीन मुद्रांक भरल्यानंतर वारस दाखला देण्यात यावा.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Digitally signed by SONTAKKE AHILYABAI BALIRAM
Date: 2026.04.04 19:02:22 +0530

माणगाव.        [श्रीमती अ.प्र.मानव(श्रीमती अ. ब. सोनटक्के)]

दिनांकः-०२.०४.२०२६.        दिवाणी न्यायाधीश क.स्तर, माणगाव.